# कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन

मुंबई (प्रतिनिधी) :

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्प बाधितांचे गिरगाव येथे पुनर्वसन करण्यात येणार असून, त्यांच्यासाठी बांधण्यात येणाऱ्या भव्य इमारतीच्या उभारणीचे कंत्राट मिळविण्यासाठी जेएमसी, टाटा, एल अँण्ड टी, शापूरजी पालनजी या कंपन्यांमध्ये चढाओढ सुरू आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशद्वारे(एमएमआरसी) मेट्रो-३ प्रकल्पाची उभारणी करण्यात येत असून या प्रकल्पाचे बहुतांश काम मार्गी लागले आहे. मेट्रो-३च्या मार्गातील काळबादेवी-गिरगाव भागातील १७ उपकरप्राप्त इमारतींसह २१ इमारतींमधील विस्थापितांचे याच भागात पुनर्वसन करण्यात येणार आहे. हे पुनर्वसन करताना सध्या ज्यांचे घर २०२ चौरस फुटांचे आहे त्यांना ४०५ चौरस फूट, २०२ ते ३०० चौरस फुटांचे घर असणाऱ्यांना ६०० चौरस फूट, ४४४ चौरस फुटांपर्यंतचे घर असणाऱ्यांना क्षेत्रफळाच्या ३५ टक्के अधिक क्षेत्रफळाचे घर देण्यात येणार आहे. व्यापारी गाळ्यांना सध्याच्या क्षेत्रफळाच्या २० टक्के अधिक जागा दिली जाणार आहे. त्यासाठी गिरगाव येथे ४८ मजली इमारत बांधण्यात येणार आहे.

या इमारतीमध्ये कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पामुळे बाधित झालेले रहिवासी, व्यावसायिक व कार्यालयांचे पुनर्वसन केले जाणार आहे. ही इमारत बांधण्यासाठी एमएमआरसीने काढलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला असून बांधकाम उद्योगातील नामवंत कंपन्या हे काम मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या कामाच्या पूर्व अर्हतेसाठी अर्ज दाखल केलेल्या कंपन्यांमध्ये जेएमसी प्रोजेक्ट (इंडिया), टाटा प्रोजेक्टस लिमिटेड, एल अँण्ड टी लिमिटेड, शापूरजी पालनजी अँण्ड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, मॉंटोकारलो लिमिटेड, मॅन इन्फ्रा कन्स्ट्रक्शन लिमिटेड आदींचा समावेश आहे.